Exampapers247 राज्य सेवा (पूर्व) परीक्षा - २०१७ Exampapers247

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET No.

2017 Code : X08

पेपर - II 02/4/2017

प्रश्नपुस्तिका

पेपर II

A

70021

एकूण प्रश्न : 80
एकूण गुण : 200

वेळ : 2 (दोन) तास

सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **80** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.



(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(क) मराठी व इंग्रजी आकलनावरील प्रश्न अनुक्रमे फक्त मराठी व फक्त इंग्रजी भाषेत असतील.

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) (अ) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत''.**

(ब) "Decision Making & Problem Solving" वरील प्रश्नांच्या चुकीच्या उत्तरांसाठी गुण वजा केले जाणार नाहीत. **प्रस्तुत प्रश्न वगळून प्रश्नपत्रिकेतील उर्वरित प्रश्नांकरिता उमेदवारांनी सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी एक तृतीयांश गुण वजा करण्यात येतील.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

ताकीद

ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

पुढील उतारावाचून त्यावर आधारित 1 ते 5 प्रश्नांची उत्तरे द्या :

1784 साली इमॅन्युएल कांट ने "प्रबोधन म्हणजे काय ?" हा ग्रंथ लिहिला. त्याने स्पष्ट केले की 'प्रबोधन म्हणजे माणसाची स्वत:होऊन स्वीकारलेल्या जोखडातून मुक्तता. हे जोखड म्हणजे दुसऱ्याने आदेश दिल्याशिवाय आपल्या आकलनसामर्थ्याचा वापर करण्यास असमर्थ असणे. विवेकबुद्धीच्या कमतरतेमुळे नव्हे, तर तिचा वापर दुसऱ्याचा आज्ञेशिवाय करण्याच्या भीतीमुळे हे जोखड स्वत:होऊन स्वीकारलेले असते. मानवजात इतक्या मोठ्या प्रमाणात आयुष्यभर या जोखडात राहते, याची प्रमुख कारणं म्हणजे आळशीपणा आणि घाबरटपणा. या कारणांमुळेच इतरांना त्यांचे तारणहार पालक म्हणून प्रस्थापित होण्याची संधी मिळते. अजाणतेपणात राहणे हे खूपच सोपे असते. ज्या पालकांनी मोठ्या कळवळ्याने त्यांच्यावर देखरेख करण्याची जबाबदारी घेतलेली असते, ते अशी योजना करतात, की मानवजातीतल्या बहुसंख्य लोकांना जाणतेपणाकडे वाटचाल करणं हे धोकादायक वाटावं. या गरीब गुरांना एकदा का आपले मुके अनुयायी बनवले, आणि त्यांना गाड्याला जखडून ठेवणाऱ्या जोखडाशिवाय हे निष्क्रिय जीव एकही पाऊल टाकणार नाहीत, याची खात्री पटली, की हे पालक त्यांना एकट्याने वाट चालण्यामधले धोके पटवून देतात. आता खरं म्हणजे हे धोके इतके काही मोठे नसतात, कारण काही वेळा पडले तरी पुन्हा उठून ते शेवटी एकट्याने वाटचाल करायला शिकतीलच. पण अपयशाच्या एखाद्या उदाहरणामुळे ते घाबरट होतात आणि बहुतेक वेळा त्यांच्या जोखडापासून मोकळीक मिळवण्याचे प्रयत्न करायलाच भिऊ लागतात. "आपला विवेक वापरण्याचं धाडस करा !" हे प्रबोधनाचं घोषवाक्य आहे.'

प्रबोधनाच्या या विचारांची परिणती फ्रेंच राज्यक्रांतीच्या राजकीय रणधुमाळीमध्ये झाली. पारंपरिक उतरंडीच्या राजकीय आणि सामाजिक व्यवस्था म्हणजेच फ्रेंच राजेशाही, सरदारमंडळींचे विशेष हक्क, कॅथलिक चर्चचे राजकीय हक्क आणि अधिकार, हे सगळे उध्वस्त झाले. मानवी विवेकाच्या तत्त्वांवर आधारलेल्या आणि सर्वांसाठी स्वातंत्र्य आणि समता या प्रबोधनकालीन ध्येयानी भारलेल्या अशा सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेने तिची जागा घेतली. यातूनच ज्यांच्यावर राज्य केले जाते त्यांच्या संमतीवर आधारलेल्या अशा राज्यव्यवस्थेच्या मूलभूत आराखड्याचा उदय झाला. त्याचा स्वाभाविक परिणाम असा झाला की प्रत्येक वैध अशा राजकीय व्यवस्थेने व्यक्तीचे मूलभूत मानवी हक्क आणि धार्मिक विविधता यांना अबाधित राखून त्यांचा आदर करावा, अशी अपेक्षा करायला समाज शिकला.

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

Read the following passage and answer the questions from 1 to 5 :

Immanuel Kant wrote a treatise called "What is Enlightenment ?" in 1784. He explained that 'Enlightenment is man's release from his self-incurred tutelage. Tutelage is man's inability to make use of his understanding without direction from another. Self-incurred is this tutelage when its cause lies not in the lack of reason but in the lack of courage to use it without direction from another. Laziness and cowardice are the reasons why so great a portion of mankind remains under lifelong tutelage, and why it is so easy for others to set themselves up as their guardians. It is so easy not to be of age. That the step to competence is held to be very dangerous by the far greater portion of mankind is seen to by those guardians who have so kindly assumed superintendence over them. After the guardians have transformed their domestic cattle into dumb followers, and have made sure that these placid creatures will not dare take a single step without the harness of the cart to which they are tethered, the guardians then show them the danger which threatens if they try to go alone. Actually, however, this danger is not so great, for by falling a few times they would finally learn to walk alone. But an example of this failure makes them timid and ordinarily frightens them away from all further trials. "Have courage to use your own reason !" — that is the motto of enlightenment.'

Enlightenment thought culminated historically in the political upheaval of the French Revolution. The traditional hierarchical political and social order — the French monarchy, the privileges of the French nobility, the political power and authority of the Catholic Church — were violently destroyed and replaced by a political and social order informed by the Enlightenment ideals of freedom and equality for all, founded, upon principles of human reason. It gave rise to a basic model of government founded upon the consent of the governed. This also taught the society to expect that certain basic individual human rights and religious diversity need to be respected and realized by any legitimate political system.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

1. माणसाने जोखड स्वत:होऊन का स्वीकारलेले असते ?

(1) आळशीपणा

(2) विवेकबुद्धीचा वापर दुसऱ्याच्या आदेशाशिवाय करण्यासाठी लागणाऱ्या धैर्याचा अभाव

(3) ते धोकादायक असते

(4) पालक नसल्यामुळे

Why is man's tutelage self-incurred ?

(1) Laziness

(2) Lack of courage to use the understanding without being directed by others

(3) It is dangerous

(4) There are no guardians

---

2. बहुसंख्य मानवजात आयुष्यभर जोखडाखाली का जखडलेली असते ?

(1) पालक हे सत्ताधीश असतात

(2) एकट्याने वाटचाल करण्यात धोके असतात

(3) आळशीपणा आणि घाबरटपणा

(4) राजसत्ता, सरदार आणि चर्चकडे सत्ता एकवटलेली असते

Why does the majority of mankind remain under lifelong tutelage ?

(1) The guardians are powerful

(2) It is dangerous to walk alone

(3) Laziness and cowardice

(4) The monarchy, nobility and Church have great powers

---

3. पुढीलपैकी कोणती बाब नव्या फ्रेंच व्यवस्थेचा पायाभूत घटक ***नव्हती*** ?

(1) कॅथलिक चर्च (2) सर्वांसाठी स्वातंत्र्य

(3) मानवी विवेकबुद्धी (4) समता

Which of the following did ***not*** form the ideological basis of the new French Order ?

(1) Catholic Church (2) Freedom for all

(3) Human reason (4) Equality

---

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

4. प्रबोधनामुळे _____ च्या पायावर आधारलेल्या राजसत्तेचा आराखडा उदयाला आला.

(1) ज्यांच्यावर राज्य करायचे त्यांच्या संमती

(2) स्वातंत्र्य, समता आणि बंधुता

(3) मानवी हक्क

(4) धार्मिक विविधता

Enlightenment resulted in the model of government that was founded on

(1) Acceptance of the people who were to be governed

(2) Liberty, Equality and Fraternity

(3) Human Rights

(4) Religious Diversity

---

5. प्रबोधनामुळे समाज कोणत्या अपेक्षा करायला शिकला ?

(1) कोणत्याही वैध राजकीय व्यवस्थेने मानवाचे मूलभूत हक्क व धार्मिक स्वातंत्र्याचा सन्मान केला पाहिजे.

(2) लोकांनी राज्यकर्त्यांना मान्यता दिली पाहिजे.

(3) माणसाने स्वतंत्र विचार करण्याचे धैर्य दाखवले पाहिजे.

(4) स्वातंत्र्य, समता आणि मानवी विवेकबुद्धी हे राज्यसत्तेचा पाया असले पाहिजेत.

What did the society learn to expect as a result of the Enlightenment ?

(1) Any legitimate political system should respect basic human rights and religious diversity.

(2) People should give consent to their rulers.

(3) Humans should have the courage to think independently.

(4) Freedom, equality and human reason should form the basis of a State.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

पुढील उतारावाचून त्यावर आधारित 6 ते 10 प्रश्नांची उत्तरे द्या :

आता यापुढे आपण संकल्पना तयार कशा होतात ते पाहूया. प्रत्येक शब्द संकल्पनेत रूपांतरित होत असताना तो ज्या पूर्णत: व्यक्तिगत व एकल अनुभवातून जन्माला आला, त्या अनुभवाशी त्याने एकनिष्ठ राहणं अपेक्षित नसतं; किंबहुना त्या अनुभवाशी मिळत्या जुळत्या असंख्य अनुभवांशी त्याने संबंधित असणं गरजेचं असतं. हे असंख्य अनुभव म्हणजे अजिबात समान नसलेले, निव्वळ असमान अनुभव ! अनेक असमान गोष्टींच्या समानीकरणातून प्रत्येक संकल्पना जन्म घेत असते. जितक्या स्वाभाविकपणे एक पान पूर्णत: दुसऱ्यासारखं नसतं हे निश्चित आहे, तितक्याच स्वाभाविकपणे हेही लक्षात येतं की 'पान' ही संकल्पना नानाविध फरकांना दुर्लक्षित करून आणि स्वच्छंदपणे व्यक्तिगत विशेषांना नाकारत निर्माण करण्यात आली आहे. याने असा समज उत्पन्न होतो की अनेक पानांव्यतिरिक्त निसर्गात एक (आदर्श) 'पान' आहे; ते पान ज्याने अन्य पानांसाठीचा कच्चा आराखडा म्हणून भूमिका बजावली, त्याला अनुसरून अन्य सगळी पानं विणली गेली, रंगवण्यात आली, मापण्यात आली, चितारली गेली... मात्र हे सगळं करणारे हात सराईत नव्हते, कुशल नव्हते. त्यामुळे कुठलीच रचना मूळ आराखड्याची योग्य, विश्वासार्ह आणि खरीखुरी प्रतिकृती बनू शकली नाही. आपण एखाद्या व्यक्तिला 'प्रामाणिक' मानतो मग विचारतो की 'आज तो इतकं प्रामाणिक कसा वागला ?' आणि आपलं नेहमीचं उत्तर असतं – त्याच्या 'प्रामाणिकपणामुळे' प्रामाणिकपणा ! याचा अर्थ असा होतो की एका आदर्श पानामुळे अन्य पानं जन्माला आली. आपल्याला प्रामाणिकपणा या मूळ आणि शुद्ध स्वरूपातल्या गुणाविषयी तसूभरही माहिती नाही. पण आपल्याला निश्चितपणे असंख्य व्यक्तिगत व परिणामत: असमान कृती माहीत आहेत, ज्यांच्यातील भेदाची लक्षणं दुर्लक्षित करून आपण त्यांचे समानीकरण करतो व त्यांना प्रामाणिक कृती असे नाव देतो. सरतेशेवटी आपण त्यांच्यातील एका छुप्या/लपलेल्या सामान्य गुणाला प्रामाणिकपणा या नावाने स्वरूप देतो. आपण जसं स्वरूप तयार करून घेतो तशीच संकल्पनाही व्यक्तिगत आणि सत्य स्थितीला डावलून तयार करतो. निसर्गाला मात्र कुठलेच मूळ आराखडे, कुठलंच स्वरूप, कुठलीच संकल्पना, कुठलीच जाति ठाऊक नाही, असल्यास निव्वळ एक क्ष माहीत आहे जो आपल्यासाठी अज्ञेय, अनाकलनीय आणि दुरापास्त आहे. कारण, आपला व्यक्ती आणि जाति मधला विरोध हाही मानवरूपी आहे आणि तो वस्तूंच्या मूळ स्वरूपात जन्माला येत नाही; मात्र आपण हेही निश्चितपणे मानता कामा नये कि हा विरोध वस्तूंच्या मूळ स्वरूपाशी काहीच संबंध दाखवत नाही. तसं मानल्यास तेही एक कट्टरपणाचं द्योतक होईल आणि त्याविरुद्ध मत प्रस्थापित करणं जितकं अशक्य, तितकंच हेही प्रस्थापित करणं अशक्य होऊन बसेल.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK P.T.O.

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

Read the following passage and answer the questions from 6 to 10 :

Let us further consider the formation of concepts. Every word instantly becomes a concept precisely insofar as it is not supposed to serve as a reminder of the unique and entirely individual original experience to which it owes its origin; but rather, a word becomes a concept insofar as it simultaneously has to fit countless more or less similar cases — which means, purely and simply, cases which are never equal and thus altogether unequal. Every concept arises from the equation of unequal things. Just as it is certain that one leaf is never totally the same as another, so it is certain that the concept 'leaf' is formed by arbitrarily discarding these individual differences and by forgetting the distinguishing aspects. This awakens the idea that, in addition to the leaves, there exists in nature the 'leaf' : the original model according to which all the leaves were perhaps woven, sketched, measured, coloured, curled, and painted — but by incompetent hands, so that no specimen has turned out to be a correct, trustworthy, and faithful likeness of the original model. We call a person 'honest', and then we ask 'why has he behaved so honestly today ?' Our usual answer is, 'on account of his honesty'. Honesty ! This in turn means that the leaf is the cause of the leaves. We know nothing whatsoever about an essential quality called 'honesty'; but we do know of countless individualized and consequently unequal actions which we equate by omitting the aspects in which they are unequal and which we now designate as 'honest' actions. Finally, we formulate from them a *qualitas occulta* which has the name 'honesty'. We obtain the concept, as we do the form, by overlooking what is individual and actual; whereas nature is acquainted with no forms and no concepts, and likewise with no species, but only with an X which remains inaccessible and undefinable for us. For even our contrast between individual and species is something anthropomorphic and does not originate in the essence of things; although we should not presume to claim that this contrast does not correspond to the essence of things : that would, of course, be a dogmatic assertion and, as such, would be just as indemonstrable as its opposite.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

6. एखाद्या शब्दाचे संकल्पनेत केव्हा रूपांतर होते ?

अ. जेव्हा त्याने एकल अनुभवाशी साधर्म्य दाखवणे अपेक्षित असते तेव्हा

ब. त्याच्या 'प्रामाणिकपणा' मुळे

क. जेव्हा तो कधीही समान नसलेल्या घटनांशी साधर्म्य साधतो तेव्हा

ड. सामान्यांना दुर्लक्षित करून

(1) फक्त अ (2) फक्त अ आणि ब

(3) फक्त क (4) वरीलपैकी सर्व

When does a word become a concept ?

a. When it is not supposed to serve as a reminder of the unique

b. On account of its 'honesty'

c. When it fits the cases which are never equal

d. By overlooking the universals

(1) Only a (2) Only a and b

(3) Only c (4) All of the above

---

7. पानाची संकल्पना कशी तयार होते ?

अ. व्यक्तिगत भेदांना स्वच्छंदपणे नाकारून

ब. विविधतेला विसरून

क. निसर्गत:

ड. मूळ आराखड्याची प्रतिकृति बनवून

(1) फक्त अ (2) फक्त अ आणि ब

(3) फक्त अ, ब आणि क (4) वरीलपैकी सर्व

How is the concept of leaf formed ?

a. Arbitrarily discarding the individual differences

b. Forgetting the distinguishing aspects

c. By nature

d. By imitating the original model

(1) Only a (2) Only a and b

(3) Only a, b and c (4) All of the above

---

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

8. निसर्गाला जर संकल्पना अवगत नसतील तर काय माहीत असते ?

अ. व्यक्ती आणि वास्तव

ब. वस्तूंचे मूळ स्वरूप

क. असमान वस्तूंचे समानीकरण

ड. ते दूरापास्त आणि अनिर्वचनीय आहे

(1) फक्त अ (2) फक्त अ, ब आणि क

(3) फक्त ड (4) फक्त ब आणि ड

What does the nature know, if not the concepts ?

a. The individual and actual

b. Essence of things

c. Equation of unequal things

d. It is inaccessible and undefinable

(1) Only a (2) Only a, b and c

(3) Only d (4) Only b and d

---

9. पानांच्या संकल्पनेशी साधर्म्य साधण्यासाठी एका-पानाला काय करावे लागते ?

अ. व्यक्तिगत भेदांशी तादात्म्य साधणे

ब. विविधतेला नाकारणे

क. विविधतेला विसरणे

ड. असमान वस्तूंचे समानीकरण

(1) फक्त अ आणि ब (2) फक्त क आणि ड

(3) फक्त अ, ब आणि ड (4) फक्त ब, क आणि ड

What actions does a leaf perform if it wants to get equated with the concept of leaf ?

a. To become one with individual differences

b. To discard the distinguishing aspects

c. To forget the distinguishing aspects

d. The equation of unequal things

(1) Only a and b (2) Only c and d

(3) Only a, b and d (4) Only b, c and d

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

10. कुठला अनुभव संकल्पना निर्माण करण्यास आधारभूत मानला जावा ?

अ. मूळ अनुभव

ब. त्वरित अनुभव

क. समानीकरणाचे तत्त्व

ड. वरीलपैकी कोणतेही नाही

(1) फक्त अ, ब आणि क

(2) फक्त ड

(3) फक्त क

(4) फक्त अ आणि ब

Which experience should count as a parameter of formulating a concept ?

a. The original experience

b. The instant experience

c. The equating principle

d. None of the above

(1) Only a, b and c

(2) Only d

(3) Only c

(4) Only a and b

पुढील उतारावाचून त्यावर आधारित 11 ते 15 प्रश्नांची उत्तरे द्या :

बाटलीबंद पाण्याचे व त्यांचे पर्यावरणीय परिणाम

पुढीलवेळी तुम्ही पाण्याची बाटली विकत घ्याल, तेव्हा क्षणभर थांबून विचार करा. तुम्ही अगदी सहजपणे एक लीटर बाटलीबंद पाण्यासाठी पंधरा रुपये खर्च करता परंतु यातील वस्तूस्थिती जाणून घेण्याचा कधीही प्रयत्न केला जात नाही. खरं तर या एक लीटर बाटलीबंद पाण्याकरीता तुम्ही चार हजार दोनशे पटीने अधिक पैसे खर्च करत आहात, कि जे पाणी तुम्हाला नळाद्वारे अत्यल्प किंमतीत मिळते.

बाटलीबंद पिण्याच्या पाण्याचे अर्थशास्त्र नेहमीच मला गोंधळवणारे वाटते. अलिकडेच दिल्ली जलबोर्डाने नळ पाणी पुरवठ्याच्या दरामध्ये अगदी नगण्य वाढ केली, तर शहरी भागातील मध्यमवर्गीयांनी त्याविरोधात निराशेचा सूर लावला. दिल्ली जलबोर्डाने केलेली ही दरवाढ तीन लीटर पाण्याकरीता केवळ एक

---

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

पैसा इतकी अत्यल्प होती. (दिल्ली जलबोर्ड एक हजार लीटर पाण्या करीता साडेतीन रुपये दर आकारते) तरी देखील शहरी लोकांना असे वाटते कि आपण यासाठी खूप पैसे देत आहोत.

जगात बाटलीबंद पाणी उद्योगाची घोडदौड सतत सुरू आहे. ग्राहकांना या पाण्याची किंमत ही काही विशेष बाब वाटत नाही. सन 2004 मध्ये 154 अब्ज लीटर पाण्याचा वापर केला गेला. यापैकी भारताचा हिस्सा 5·1 अब्ज लीटर होता. वार्षिक सरासरी वाढीचा दर 40 टक्के गृहीत धरल्यास संपूर्ण भारत देशात सुमारे 1200 हून अधिक बाटलीबंद पाण्याचे उद्योग कार्यरत असून त्यांची उलाढाल 1800 कोटी रुपयांची आहे.

जर तुम्हाला वाटत असेल कि बाटलीबंद पाणी शुद्ध व सुरक्षित आहे तर तुम्ही पुन्हा [illegible] करण्याची हीच वेळ आहे. संयुक्त संस्थानासारख्या देशात कि जेथे अन्न व औषध प्रशासनाचे गुणवत्तेचे निकष अतिशय कठोर आहेत. तेथे देखील असे गृहित धरले जाते कि, जवळ जवळ 40 टक्के बाटलीबंद पाणी हे नळ अथवा पाइपद्वारे आलेले पाणी पुन्हा बाटलीबंद केले जाते.

एक लीटर बाटलीबंद पाणी निर्मिती करीता पाच लीटर पाण्याची गरज असते, हे अतिशय धक्कादायक आहे. हेच दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास 154 अब्ज लीटर बाटलीबंद पाणी निर्मितीकरीता 770 अब्ज लीटर पाणी वापरावे लागते. हे पाणी 2004 साली जगात वापरलेल्या एकूप पाण्याइतके होते. किती प्रचंड अपव्यय आहे हा !

याशिवाय बाटलीबंद पाण्याची अतिरिक्त छूपी पर्यावरणीय किंमत सुद्धा आहे. पॅसिफीक इन्स्टिट्यूट इन कॅलिफोर्निया यांच्या पाहणीनुसार बाटलीबंद पाण्यासाठी आवश्यक असलेले प्लॅस्टीक निर्माण करताना मोठ्या प्रमाणात ऊर्जा वापरावी लागते. एकट्या अमेरिकेत जवळ जवळ 26 अब्ज लीटर बाटलीबंद पाणी सन 2004 मध्ये वापरले गेले. यासाठी प्रक्रिया आणि वाहतुकीकरीता सुमारे 20 दशलक्ष पिंपे (बॅरल) खनिजतेल वापरले गेले. तसेच यामाध्यमातून जमा होणारा प्लॅस्टीक कचरा व वापरलेल्या बाटल्या यामुळे मोठ्या प्रमाणात भूजल दूषित होते व ही संपूर्ण प्रक्रिया जागतिक तापमान वृद्धीस कारणीभूत आहे.

बाटलीबंद पाणी उद्योगामुळे होणारे प्रचंड पर्यावरणीय नुकसान लोक विचारात घेणार का ? होय संयुक्त संस्थानातील अनेक हॉटेल्सनी आपल्या ग्राहकांना बाटलीबंद पाण्या ऐवजी फिल्टर केलेले पाणी देण्यास सुरूवात केली आहे. शहर नियोजन विभाग व प्रशासन देखील आता याकडे गांभीर्याने पाहू लागले आहे. अलिकडेच सॅन फ्रान्सिस्कोचे महापौर गॅविन न्यूसम यांनी वटहुकूम काढून निर्देशित केले कि, शहरातील विविध विभाग, संस्था, कंत्राटदार व शहराचा निधी वापरणाऱ्या संघटनांनी जेथे नळाद्वारे पाणीपुरवठा केला जातो तेथे प्लॅस्टीक बाटलीतून पाणी पुरविण्यास बंदी घालावी. त्यांच्या या निर्णयाचे समर्थन करताना त्यांनी सांगितले कि स्थानिक रहिवाशांना एक लीटर बाटलीबंद पाण्याच्या किंमतीत नळाद्वारे एक हजार पाणी उपलब्ध होते.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

Read the following passage and answer the questions from 11 to 15 :

Bottled Water and Its Environmental Cost

The next time you buy a bottle of drinking water, you need to pause and think. You may not bat an eyelid shelling out ₹ 15 for a litre of bottled water but what you don't realise is that you are actually paying over 4,200 times of what you normally pay for a litre of tap water.

The economics of drinking water has always baffled me. What is perplexing is that the average urban middle class squirms and protests if the Delhi Jal Board, for instance, tries to 'nominally' raise the price of tap water. Paying a little over one paise for three litres of tap water (DJB prices tap water at ₹ 3·50 per 1000 litres) they feel they are already being made to pay through the nose.

Price being of little constraint for the consumers, the global bottled water industry is galloping. In 2004, the world consumed 154 billion litres, of which India's share was 5·1 billion litres. Expected to grow at 40 percent annually, the ₹ 1,800-crore bottle water industry is experiencing unprecedented boom with over 1200 water factories doing business throughout the country.

If you think bottled water assures you of purity and safety, it is time you think again. Even in the U.S., despite strict quality norms formulated by the Food and Drug Administration, it is safely assumed that nearly 40 percent of the bottled water is repacked pipe water.

Shockingly, what is little known is that more than five litres of water is required to produce every litre of packed water. In other words, 770 billion litres of water were used to produce and pack the 154 billion litres of water that the world consumed in 2004. What a colossal waste !

Bottled water also has additional, hidden environmental costs. According to the Pacific Institute in California, the entire process of making plastic for the bottles requires huge energy. In America alone, where nearly 26 billion litres of bottled water was consumed in 2004, an equivalent of 20 million barrels of oil was

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

required every year to manufacture and transport the bottles. The accumulation of plastic bottles in the landfills also adds to global warming besides contaminating the groundwater.

But are people beginning to see the damage being done by the bottled water industry ? Yes, a number of restaurants in the U.S. have begun to serve only filtered water to customers instead of bottled water. City authorities are also waking up. Recently, San Francisco Mayor, Gavin Newsom has issued an order to ban city departments, agencies and contractors from using city funds to serve water in plastic bottles and in larger dispensers when tap water is available. His argument is that for the price of one litre of bottled water local residents can purchase 1000 litres of safe drinking water from the taps.

---

11. बाटलीबंद पाण्याची पर्यावरणीय किंमत काय आहे ?

अ. 20 दशलक्ष तेलाच्या पिंपांचा वापर

ब. जागतिक तापमान वाढ

क. भूजलाचे प्रदूषण

ड. निर्वनीकरण

(1) फक्त अ आणि ब

(2) फक्त ब आणि क

(3) फक्त अ, ब आणि क

(4) फक्त क आणि ड

What is the environmental cost of bottled water ?

a. 20 million barrels of oil

b. Global warming

c. Contamination of groundwater

d. Deforestation

(1) Only a and b

(2) Only b and c

(3) Only a, b and c

(4) Only c and d

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

12. बाटलीबंद पाण्यामुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी संयुक्त संस्थांनांनी खालीलपैकी कोणते निर्णय घेतले ?

अ. उपहारगृहात फक्त शुद्ध केलेले पाणी देणे

ब. शहरातील विभाग, काम करणाऱ्या संस्था व कंट्राटदारास बाटलीतून पाणी देण्यास शहराचा निधी वापरण्यास बंदी

क. नळाद्वारे जेथे पाणी पुरवठा केला जातो तेथे मोठ्या प्रमाणात प्लॅस्टीक बाटलीतून पाणी देण्यास बंदी.

(1) फक्त अ आणि ब (2) फक्त क

(3) फक्त अ आणि क (4) वरीलपैकी सर्व

Which of the following steps are taken in the U.S. to reduce the damage caused by bottled water ?

a. Serve only filter water in restaurants

b. Ban city departments, agencies and contractors from using city funds to serve water in plastic bottles

c. To ban water from bottles in large scale where tap water is available

(1) Only a and b (2) Only c

(3) Only a and c (4) All of the above

13. खालीलपैकी कोणते विधान प्लॅस्टीकच्या बाटल्यांचा वापर करण्यासंबंधी बरोबर *नाही* ?

अ. जागतिक जल उद्योगधंदा घोडदौड करत आहे.

ब. भारतात 1200 बाटलीबंद पाण्याचे कारखाने आहेत.

क. संयुक्त संस्थानांत 50 टक्के बाटलीबंद पाणी नळाच्या पाण्याने पुन्हा बाटलीबंद केले जाते.

ड. प्लॅस्टीकच्या बाटल्यांच्या जमिनीत साठण्यामुळे भूजल प्रदूषण होते.

(1) फक्त अ आणि ब (2) फक्त क आणि ड

(3) फक्त क (4) फक्त ड

Which of the following statements is ***not*** correct about bottled water industry ?

a. Global water industry is galloping.

b. There are 1200 bottled water factories in India.

c. In USA 50% of the bottled water is repacked by pipe water.

d. Accumulation of plastic water bottles in landfills adds to contamination of groundwater.

(1) Only a and b (2) Only c and d

(3) Only c (4) Only d

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK P.T.O.

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

14. 1 लीटर बाटलीबंद पाणी उत्पादन करण्यासाठी किती पाण्याची आवश्यकता असते ?

(1) 2 लीटर

(2) 4 लीटर

(3) 5 लीटर

(4) 100 लीटर

How much water is required to produce every 1 litre of bottled water ?

(1) 2 litres

(2) 4 litres

(3) 5 litres

(4) 100 litres

---

15. संयुक्त संस्थानांत दरवर्षी बाटलीबंद पाण्याचे उत्पादन करण्यासाठी आणि त्याची वाहतूक करण्यासाठी किती पिंपे तेलची गरज असते ?

(1) 10 दशलक्ष

(2) 20 दशलक्ष

(3) 5 दशलक्ष

(4) 2 दशलक्ष

In U.S., how many barrels of oil is required every year to manufacture and transport the bottled water ?

(1) 10 million

(2) 20 million

(3) 5 million

(4) 2 million

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

पुढील उतारावाचून त्यावर आधारित 16 ते 20 प्रश्नांची उत्तरे द्या :

गरीबीचे अनेक मार्ग आहेत विशेष महत्वाचे म्हणजे त्यापैकी बहुतांश हे नियंत्रणातील असतात. तीच बाब श्रीमंतीबाबतही म्हणता येईल. मला वाटते गरीबी आणि श्रीमंती दोन्हीही नष्ट करणे शक्य आहे आणि ते इष्टही आहे याबाबत काही शंका नाही. दोन्ही अनैसर्गिक आहेत, मात्र त्यांच्या नष्टतेसाठी कायदा नाही तर कामाकडेच लक्ष द्यावे लागेल.

माझ्या दृष्टीने गरीबी म्हणजे योग्य पद्धतीने आवश्यक ते अन्न, निवारा व वस्त्र यांचा व्यक्ती किंवा कुटुंबांसाठीचा अभाव. अन्न पौष्टीकतेमध्ये भिन्नता आढळते. सर्वच माणसे मानसिकदृष्ट्या वा शारीरिकदृष्ट्या समान नसतात. म्हणूनच माणसांना समान गृहित धरणारा वा समान असावेत असे मानणारा कोणताही आराखडा हा अनैसर्गिक व कृतित न आणता येणारा असतो. सर्वांना एका पातळीवर आणणे ही प्रक्रिया शक्य व इष्ट नाही. असा प्रयत्न हा गरीबीलाच प्रोत्साहन देऊन – अपवादात्मक करण्याऐवजी सार्वत्रिक ठरेल. कार्यक्षम उत्पादकास अकार्यक्षम होण्याची सक्ती केल्याने जसे अकार्यक्षम उत्पादक कार्यक्षम होत नाही, तसे हे आहे. मुबलक उपलब्धतेमुळेच गरीबी दूर होऊ शकते. सध्या आपण उत्पादन तंत्रशास्त्रात नैसर्गिक विकास म्हणून बरीच प्रगती केली आहे. ज्या दिवशी उत्पादन आणि वितरण हे इतके शास्त्रीय होईल की सर्वांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे व उद्योगाप्रमाणे उपलब्ध होईल.

टोकाचे समाजवादी अशा मनाचे आहेत की उद्योग – हे अंतिमत: कामगारांची पिळवणूक करतील. मात्र आधुनिक उद्योग विश्व हे कामगारांना आणि जगाला हळू हळू वरच्या पातळीवर नेत आहे. आपल्याला केवळ नियोजन व कार्यपद्धती समजून घेणे आवश्यक आहे. वैयक्तिक पुढाकार आणि कल्पकता यासह हुशार नेतृत्व यामुळेच सर्वोत्तम परिणाम साध्य होईल.

मूलत: नकारात्मक असणारे शासन कोणत्याही खऱ्या रचनात्मक कार्यक्रमासाठी (उपक्रमासाठी) सकारात्मक मदत देऊ शकत नाही. समाजावरील बोजा थांबविणारी आणि प्रगतीच्या मार्गातीले अडथळे दूर करणारी मदत नकारात्मक असू शकते. गरीबीच्या मुळाशी असणारी कारणे म्हणजे सत्तामार्ग व तिचा वापर, शेती आणि उद्योग या दोन्ही क्षेत्रातील उत्पादन आणि वितरण यातील वाईट तडजोडी होय.

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

Read the following passage and answer the questions from 16 to 20 :

Poverty springs from a number of sources, the more important of which are controllable. So does special privilege. I think it is entirely feasible to abolish both poverty and special privilege and there can be no questions but that their abolition is desirable. Both are unnatural, but it is work, not law, to which we must look for results.

By poverty I mean the lack of reasonably sufficient food, housing, and clothing for an individual or a family. There will have to be differences in the grades of sustenance. Men are not equal in mentality or in physique. Any plan which starts with the assumption that men are or ought to be equal is unnatural and therefore unworkable. There can be no feasible or desirable process of leveling down. Such a course only promotes poverty by making it universal instead of exceptional. Forcing the efficient producer to become inefficient does not make the inefficient producer more efficient. Poverty can be done away with only by plenty, and we have now gone far enough along in the science of production to be able to see, as a natural development, the day when production and distribution will be so scientific that all may have according to ability and industry.

The extreme Socialists went wide of the mark in their reasoning that industry would inevitably crush the worker. Modern industry is gradually lifting the worker and the world. We only need to know more about planning and methods. The best results can and will be brought about by individual initiative and ingenuity — by intelligent individual leadership. The government, because it is essentially negative, cannot give positive aid to any really constructive programme. It can give negative aid — by removing obstructions to progress and by ceasing to be a burden upon the community.

The underlying causes of poverty, as I can see them, are essentially due to the bad adjustment between production and distribution, in both industry and agriculture — between the source of power and its application.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

16. गरीबी व श्रीमंती हे दोन्ही _____ आहेत.

(1) नैसर्गिक (2) अनैसर्गिक

(3) परमेश्वराची देणगी (4) वरीलपैकी सर्व

Poverty and privilege both are

(1) Natural (2) Unnatural

(3) God-gifted (4) All of the above

---

17. गरीबी चा व्याख्या, पुढीलपैकी कोणती बरोबर आहे ?

(1) जमिनीचा अभाव

(2) अन्नाचा अभाव

(3) घरांचा (निवारा) अभाव

(4) अन्न, वस्त्र व निवाराचा अभाव

Poverty is defined as

(1) Lack of land

(2) Lack of food

(3) Lack of housing

(4) Lack of food, housing and clothing

---

18. अनैसर्गिक व अंमलात आणता न येणाऱ्या नियोजनात काय गृहित धरले आहे ?

(1) निसर्ग अमर्याद संसाधने पुरवतो

(2) माणसे समान आहेत व असतात

(3) शहरीकरण हा विकासाचा पाया आहे

(4) उत्पन्नाचे समान वाटप

What is assumed in an unnatural and unworkable plan ?

(1) Nature provides unlimited resources

(2) Men are or ought to be equal

(3) Urbanisation is the base for development

(4) Equal distribution of income

---

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

19. समाजवाद्यांच्या मते

(1) औद्योगिकरण हे सामान्य माणसाच्या विरुद्ध आहे

(2) भांडवलदार हे कामगारांच्या विरोधी आहेत

(3) उद्योग हे कामगारांची पिळवणूक करतात

(4) कामगार हा विकासाचा कणा आहेत

Socialists are of the opinion that

(1) Industrialization is against common man

(2) Capitalists are against the workers

(3) Industry would crush the workers

(4) Workers are the backbone of development

---

20. परिच्छेदावर आधारित पुढीलपैकी कोणते विधान ***चुकीचे*** आहे ?

अ. सरकार मूलत: नकारात्मक असते.

ब. सरकार सकारात्मक मदत देऊ शकते.

क. सरकार नकारात्मक मदत देऊ शकते.

(1) फक्त ब

(2) फक्त अ आणि क

(3) फक्त अ, ब आणि क

(4) फक्त अ

Based on the passage, which of the following statements is ***not correct*** ?

a. Government is essentially negative.

b. Government can give the positive aid.

c. Government can give the negative aid.

(1) Only b

(2) Only a and c

(3) Only a, b and c

(4) Only a

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

पुढील उताराचून त्यावर आधारित 21 ते 25 प्रश्नांची उत्तरे द्या :

ध्वनी तरंग हे कणांच्या कंपनामुळे तयार होतात आणि भौतिक माध्यमातून अनुतरंग स्वरूपात प्रसरण पावतात. 20 Hz पेक्षा कमी वारंवारता असणाऱ्या ध्वनी तरंगांना अवश्रव्य तरंग म्हणतात. मानवी कान 20 Hz ते 20000 kHz या वारंवारते मधील ध्वनी तरंग ऐकू शकतात. ही श्रवण मर्यादा होय. श्रवण मर्यादेपेक्षा जास्त वारंवारता असणारे ध्वनी तरंग विशिष्ट प्राण्यांनाच ऐकू येतात उदा. मांजर, कुत्रा, वटवाघूळ इ. या तरंगांना श्रव्यातीत तरंग म्हणतात. वटवाघूळ उडत असताना श्रव्यातीत तरंग निर्माण करते. हे तरंग त्यांच्या मार्गातील अडथळ्यावर आदळून परावर्तित होतात. वटवाघूळाला हा प्रतिध्वनी ऐकू आल्यामुळे त्याला अडथळ्याचे ज्ञान होते. त्यामुळे वटवाघूळ अंधारात सुद्धा त्यांचा मार्ग शोधू शकतो.

पिझोइलेक्ट्रीक ऑसिलेटर आणि मॅग्नेटोस्ट्रिक्शन ऑसिलेटर या पद्धतींचा वापर करून श्रव्यातीत तरंग निर्माण केले जातात. तसेच कुंडस् ट्युब, क्वॉर्टझ क्रिस्टल आणि थर्मल डिटेक्टर या पद्धतींचा वापर करून श्रव्यातीत तरंग शोधले जातात.

ज्या तरंगांची वारंवारता जास्त असते, त्यांच्या अंगी जास्त ऊर्जा असते. म्हणूनच श्रव्यातीत तरंगांच्या अंगी जास्त ऊर्जा असते. ध्वनी तरंगाप्रमाणेच श्रव्यातीत तरंग परावर्तित होतात, आपवर्तित होतात व ग्रहण केले जातात. वारंवारतेच्या प्रमाणात त्यांचा वेग वाढतो.

श्रव्यातीत तरंगांचा, औद्योगिक, वैज्ञानिक व वैद्यकीय शास्त्रामध्ये अनेक प्रकारे वापर केला जातो. साऊंड नेव्हिगेशन ॲण्ड रेंजींग (SONAR) हे असे उपकरण आहे की ते श्रव्यातीत लहरी निर्माण करते, वितरित करते व ग्रहण करते. यात पाण्याखालील वस्तूंचे अंतर व दिशा ठरवण्यासाठी श्रव्यातीत तरंगांचा वापर करतात उदा. पाणबुडी, आईसबर्ग, इ. या तंत्राचा वापर समुद्राची खोली काढण्यासाठी होतो. यात जहाजावर प्रक्षेपक व शोधक बसवलेले असतात. श्रव्यातीत तरंगांचा जहाजावरून जहाजावर संपर्क साधण्यासाठी, प्लास्टिकचे पृष्ठभाग एकत्र जोडण्यासाठी, दुधासारख्या द्रव्यातील जीवाणू मारून टाकण्यासाठी व त्यायोगे ते द्रव अधिक काळ टिकवून ठेवण्यासाठी, हृदयांच्या ठोक्यांचे तंत्रज्ञान, मानवी शरीराच्या अंतर्गत अवयवांच्या प्रतिमा मिळवण्यासाठी, कारखान्यांमध्ये यंत्राचे भाग स्वच्छ करण्यासाठी, धातूच्या ठोकळ्यातील तडे व भेगा दर्शवण्यासाठी सुद्धा वापर केला जातो.

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

Read the following passage and answer the questions from 21 to 25 :

Sound waves are formed due to vibrations of particles and propagate in a material medium in the form of longitudinal waves. The sound waves of frequency less than 20 Hz are called infrasonic waves. The human ear can hear the sound waves between frequency range 20 Hz to 20000 kHz. This is the audible range. The sound waves of frequency greater than the audible range are audible to certain animals such as cats, dogs, bats, etc. These are the ultrasonic waves. While flying, a bat produces ultrasonic waves. These waves strike obstacles in their path and are reflected. The bat can use echoes to detect the obstacles and hence avoid collisions with them. Thus a bat can find its way even is the dark.

Ultrasonic waves are produced by piezoelectric oscillators and magnetostriction oscillator method and detected by Kundt's tube, Quartz crystal and Thermal detector methods.

The waves having more frequency, possess more energy. Hence ultrasonic waves possess high energy. Like sound waves, ultrasonic waves also get reflected, refracted and absorbed. Their velocity increases with frequency.

Ultrasonic waves are used in many industrial, scientific and medical sciences. Sound navigation and ranging (SONAR) is the instrument which can produce, transmit and receive ultrasonic waves. This technique is used to determine the distance and location of underwater objects such as submarines, icebergs, etc. using ultrasonic waves. It can be used to determine the depth of the sea. For this a transmitter and a detector are installed in a ship. Ultrasonic waves are also used for ship to ship communication, welding plastic surfaces, to kill bacteria in liquids like milk to preserve them, in echocardiography, for imaging internal organs of the human body, in industry to clean parts of machines, to detect cracks and flaws in metal blocks.

---

21. श्रव्यातीत तरंग _____ या स्वरूपाचे असतात.

(1) अवतरंग (2) अनुतरंग

(3) इलेक्ट्रोमॅग्नेटीक (4) स्थिर

Ultrasonic waves are _____ in nature.

(1) Transverse (2) Longitudinal

(3) Electromagnetic (4) Stationary

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

22. श्रव्यातीत तरंग असे तरंग आहेत की ते
(1) मानव ऐकू शकत नाही (2) मानव ऐकू शकतो
(3) त्यांची वारंवारता कमी आहे (4) वरीलपैकी एकही नाही

Ultrasonic waves are those waves which
(1) human beings cannot hear (2) human beings can hear
(3) have less frequency (4) None of the above

---

23. हृदयांच्या ठोक्यांचे तंत्रज्ञान यावर आधारित आहे
(1) अवतरंग (2) अवश्रव्य तरंग
(3) श्रव्यातीत तरंग (4) अनुतरंग

The echocardiography technique is based on
(1) Transverse waves (2) Infrasonic waves
(3) Ultrasonic waves (4) Longitudinal waves

---

24. समुद्राची खोली काढण्यासाठी या तंत्राचा वापर करतात :
(1) थर्मल डिटेक्टर (2) कुंडस् ट्युब
(3) ऑसिलेटर (4) सोनार (SONAR)

To determine the depth of sea this technique is used :
(1) Thermal detector (2) Kundt's tube
(3) Oscillator (4) SONAR

---

25. वारंवारता _____ असलेल्या तरंगांचा दुधासारख्या द्रवातील जीवाणू मारून टाकण्यासाठी वापर होतो.
(1) 20 Hz पेक्षा कमी
(2) 20 Hz ते 20 kHz यामधील
(3) 20 kHz पेक्षा जास्त
(4) वरीलपैकी एकही नाही

The waves of frequency _____ are used to kill the bacteria in liquids like milk.
(1) less than 20 Hz
(2) between 20 Hz to 20 kHz
(3) greater than 20 kHz
(4) None of the above

---

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial Telegram: www.t.me/mpscbooks

पुढील उताराचून त्यावर आधारित 26 ते 30 प्रश्नांची उत्तरे द्या :

